# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील अठ्ठाविसावा रविवार

## सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना : सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** प्रभो, आमचे ओठ उघड.

**प्रतिसाद:** आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** आपण परमेश्वराची प्रजा आहोत. त्याच्या हातचा कळप आहोत, चला, आपण त्याचा जयजयकार करू, आल्लेलुया.

**स्तोत्र १००**

**अ**हो पृथ्वीवरील सर्व लोकहो,
परमेश्वराचा जयजयकार करा,
हर्षाने परमेश्वराची सेवा करा,
गीत गात त्याच्यापुढे या. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**प**रमेश्वर हाच देव आहे हे जाणा;
त्यानेच आम्हाला उत्पन्न केले;
आम्ही त्याचेच आहो,
आम्ही त्याची प्रजा, त्याच्या कुरणातील कळप आहो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**त्या**चे उपकार स्मरण करीत,
त्याच्या द्वारात स्तवन करीत त्याच्या अंगणात प्रवेश करा;
त्याचे उपकारस्मरण करा;
त्याच्या नावाचा धन्यवाद करा. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**का**रण परमेश्वर चांगला आहे;
त्याची दया सनातन आहे आणि
त्याची सत्यता पिढयान्पिढया टिकते. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो.

आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत: आपण परमेश्वराची प्रजा आहोत. त्याच्या हातचा कळप आहोत, चला, आपण त्याचा जयजयकार करू, आल्लेलुया.

गीत : सामान्य काळातील गीत

## स्तोत्र ११८

प्रतिगीत १: प्रभूला धन्यवाद द्या कारण त्याची दया सनातन आहे, आल्लेलुया.

परमेश्वराचे उपकारस्मरण करा,
कारण तो चांगला आहे;
कारण त्याची दया सनातन आहे.

आता इस्त्राएलाने म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.
अहरोनच्या घराण्याने म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.
परमेश्वराचे भय धरणाऱ्यांनी म्हणावे की,
त्याची दया सनातन आहे.

अडचणीत असताना मी परमेशाचा धावा केला;
तो ऐकून परमेशाने मला प्रशस्त स्थळी नेले.
परमेश्वर माझ्या पक्षाचा आहे;
मी भिणार नाही.
मनुष्य माझे काय करणार?
माझा साहाय्यकर्ता परमेश्वर माझ्या पक्षाचा आहे;

मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा
परमेश्वराला शरण जावे हे बरे.
अधिपतींवर भरवसा ठेवण्यापेक्षा
परमेश्वराला शरण जावे हे बरे.

**स**र्व राष्ट्रांनी मला घेरिले आहे;
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.
त्यांनी मला घेरिले आहे;
खरोखर मला घेरिले आहे;
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.
त्यांनी मला मधमाश्यांप्रमाणे घेरिले आहे;
कांटयाकुटयांच्या आगीप्रमाणे ते विझून जातील.
परमेश्वराच्या नावाने मी त्यांचा उच्छेद करीन.

**मी** पडावे म्हणून तू मला जोराने धक्का दिला,
पण परमेश्वराने मला सावरिले आहे.
परमेश्वर माझे बल़, माझे गीत आहे;
तो माझे तारण झाला आहे.
उत्सवाचा व तारणाचा शब्द नीतिमानांच्या वस्तीत आहे:

**प**रमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो.
परमेश्वराचा उजवा हात उभारिलेला आहे;
परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो.
मी मरावयाचा नाही, तर जगेन,
आणि परमेश्वराच्या कृत्यांचे वर्णन करीन.
परमेशाने मला जबर शासन केले;
तरी मला मृत्युच्या हवाली केले नाही.

**मा**झ्यासाठी नीतिमत्त्वाची द्वारे उघडा
म्हणजे मी त्यातून प्रवेश करून परमेशाचे उपकारस्मरण करीन.
हे परमेश्वराचे द्वार आहे;
ह्यातून नीतिमान प्रवेश करोत.
तू माझे ऐकले आहे;
तू माझे तारण झाला आहेस,
म्हणून मी तुझे उपकारस्मरण करितो.

**बां**धणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड कोनशिला झाला आहे.
ही परमेश्वराची करणी आहे;
ती आमच्या दृष्टीने अद्भुत आहे.

परमेश्वराने नेमिलेला दिवस हाच आहे.
ह्यांत आपण उल्हास व आनंद करू.

**हे** परमेश्वरा, आम्ही तुला विनवितो की,
आमचे तारण कर.
हे परमेश्वरा, आम्ही तुला विनवितो की,
आमचा उत्कर्ष कर.
परमेश्वराच्या नावाने येणारा धन्यवादित असो.
परमेश्वराच्या घरातून आम्ही तुम्हास आशीर्वाद देतो.
परमेश्वर देव आहे,
त्याने आपल्याला प्रकाश दिला आहे.
उत्सवाचा यज्ञपशू वेदीच्या शिंगांस दोऱ्यांनी बांधा.

**तू** माझा देव आहेस;
मी तुझे उपकारस्मरण करीन;
हे माझ्या देवा, मी तुझी थोरवी गाईन;
परमेश्वराचे उपकारस्मरण करा;
कारण तो चांगला आहे.
कारण त्याची दया सनातन आहे.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १ ः प्रभूला धन्यवाद द्या कारण त्याची दया सनातन आहे, आल्लेलुया.

******

काव्य - तीन युवकांचे गीतः २९ - ३५

प्रतिगीत २ : आल्लेलुया, प्रभूच्या सर्व कृत्यांनो प्रभूचा धन्यवाद गा, आल्लेलुया.

**हे** प्रभो, आमच्या पूर्वजांच्या देवा, तू धन्य आहेस.
सर्वकाळ तुझी स्तुती असणे आणि प्रशंसा होणे योग्य आहे.

**तु**झे वैभवशाली आणि पवित्र नाम धन्य,
त्याची मोठी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

तुझ्या पवित्र वैभवाच्या मंदिरामध्ये तू धन्य.
त्याची वाखाणणी होवो.
त्याचे वैभव सर्वकाळ पसरो.

खेरूबावर आरूढ होऊन गर्तेतही दृष्टी टाकणाऱ्या तू धन्य़
तुझी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

आपल्या राज्याच्या सिंहासनारूढ असणाऱ्या तू धन्य,
तुझी वाखाणणी होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

सर्व दूत आणि संतगण तुला धन्यवाद देवोत,
तुझी स्तुती होवो आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

स्वर्गामधून, पृथ्वीवरून व समुद्रामधून तुझी स्तुती होवो
आणि सर्वकाळ प्रशंसा होवो.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २: आल्लेलुया, प्रभूच्या सर्व कृत्यांनो प्रभूचा धन्यवाद गा, आल्लेलुया.

*******

## तोत्र १५०

प्रतिगीत ३: प्रत्येक सजीव प्रभूचे स्तवन करो आल्लेलुया.

परमेश्वराचे स्तवन करा.
देवाचे त्याच्या पवित्रस्थानी स्तवन करा;
त्याच्या सामर्थ्याच्या अंतराळात त्याचे स्तवन करा.
त्याच्या पराक्रमाच्या कृत्यांबद्दल त्याचे स्तवन करा;
त्याच्या थोरवीच्या वैपुल्यानुसार त्याचे स्तवन करा.

कर्णा वाजवून त्याचे स्तवन करा.
सतार व वीणा वाजवून त्याचे स्तवन करा.
डफ वाजवून व नृत्य करून त्याचे स्तवन करा.
तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्याचे स्तवन करा.

**ख**णखणणारे टाळ वाजवून त्याचे स्तवन करा.
झणझणणाऱ्या झांजा वाजवून त्याचें स्तवन करा.
प्रत्येक प्राणी परमेशाचे स्तवन करो.
परमेशाचे स्तवन करा.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** प्रत्येक सजीव प्रभूचे स्तवन करो आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** २ तिमथी २: ८, ११ - १३

माझ्या सुवार्तेप्रमाणे मेलेल्यांतून उठविलेला, दावीदाच्या संतानांतील येशू ख्रिस्त, ह्याची आठवण ठेव. हे वचन विश्‍वसनीय आहे की, जर आपण त्याच्याबरोबर मेलो तर त्याच्याबरोबर जिवंतही राहू. जर आपण धीराने सोसतो, तर त्याच्याबरोबर राज्यही करू; आपण त्याला नाकारू तर तोही आपल्याला नाकारील; आपण अविश्‍वासी झालो तरी तो विश्‍वसनीय राहतो, कारण त्याला स्वत:विरूद्ध वागता येत नाही.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझ्या नावाने आरोळी मारतो.

प्रतिसाद: हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझ्या नावाने आरोळी मारतो.

चरण: तुझ्या महत्‌कृत्यांची आम्ही आठवण करतो.

प्रतिसाद: हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझ्या नावाने आरोळी मारतो.

त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.

प्रतिसाद: हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझ्या नावाने आरोळी मारतो.

## जखऱ्याचे स्तोत्र

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** तुम्ही सर्व सोडून देऊन माझ्यामागे आलेले आहात; तुम्हाला ते सर्व शंभरपटीने मिळेल व सार्वकालिक जीवनही प्राप्त होईल.

**इ**स्त्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची ‘खंडणी भरून सुटका’ केली आहे;

**आ**णि आपल्यासाठी त्याने आपला दास ‘दावीद'
ह्याच्या घराण्यात ‘बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;’

**म्ह**णजे आपल्या ‘शत्रूंच्या’ व आपला ‘द्वेष करणाऱ्या’
सर्वांच्या ‘हातून’ सुटका करावी;
अशासाठी की, ‘आपल्या पूर्वजांवर’ त्याने ‘दया’ करावी.
आणि त्यानें ‘आपला’ पवित्र ‘करार’ म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज ‘अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली’, ती ‘स्मरावी’,

**ती** अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

**आ**णि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण ‘प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे’ चालशील;

**ह्या**साठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.
आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

‘**ह्या**साठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा’,
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** तुम्ही सर्व सोडून देऊन माझ्यामागे आलेले आहात; तुम्हाला ते सर्व शंभरपटीने मिळेल व सार्वकालिक जीवनही प्राप्त होईल.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

आमच्या तारणाऱ्या एकमेव देवाला, आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे गौरव, वैभव, राज्य, अधिकार, सर्व काळापूर्वी आता आणि सदासर्वकाळ असो. प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

विश्वाच्या निर्मात्या, आम्ही तुझी स्तुती गातो; आम्ही पापी, तुझ्या कृपेचे गरजवंत आहोत; पण आता तू आम्हास तुझ्या ज्ञानात व सेवेत राहाण्यास पाचारण केले आहेस. प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

तुझ्या पुत्राने आम्हाला मार्ग दाखविला; त्याला अनुसरताना आम्ही जीवनाकडे नेणाऱ्या मार्गापासून कधीही भरकटू नये. प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

आज आम्ही तुझ्या पुत्राचे पुनरूत्थान साजरे करीत आहोत; दु:ख सहन करतांना व आनंदाच्या समयी पुनरूत्थानाने आम्हाला दृढ आनंद लाभो. प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

हे प्रभो, आम्हाला प्रार्थनेची व स्तुतीची वृत्ती दे; आम्ही सदोदित व सर्वत्र तुला धन्यवाद द्यावेत. प्रतिसाद: हे प्रभो, आम्ही तुझी स्तुती गातो; तू आमचा प्रभू आहे हे कृतज्ञतेने स्वीकारतो.

आमच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना:

हे प्रभू देवा, तुझ्या कृपेसाठी आमची हृदये उघड. आम्ही सदा तुझ्या इच्छेनुसार वागावे म्हणून तुझी कृपा आमच्यापुढे व आमच्यासोबत असू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

प्रतिसाद: आमेन.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.